वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शनिवार दि. ५ जुलै २०२५ पाने ४ किंमत ३

# राज अन् उध्दव एकत्रीकरणारे महायुतीला घाम

## आमच्या मधला अंतरपाट अनाजी पंतांनी दुर केला



Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## तुमच्याकडे सत्ता असेल ती विधान भवनात, आमच्याकडे सत्ता आहे ती रस्त्यावर

## यांचं मराठीप्रेम म्हणजे निवडणुका जवळ आल्या की आठवण येणारी राजकीय नौटंकी



### उध्दव आणि राज ठाकरे यांनी एकत्र येत राज्य सरकार विरोधात केला एल्गार

मुंबई, (दिव्य न्युज):- ठाकरे बंधूंचा विजयी मेळावा आज पार पडला. वीस वर्षांनंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकाच मंचावर एकत्र आले. यावेळी उद्धव ठाकरेंनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खोचक टोला लगावला. आज आमचं एकत्र दिसणं महत्त्वाचं आहे. पण एक गोष्ट नक्की आमच्या दोघांमधला जो अंतरपाट होता तो अनाजी पंतांनी दूर केला असं म्हणत निशाणा साधला. उद्धव ठाकरे यांच्या टीकेला आता भाजपाने जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. मुंबईत सत्तेत असताना मराठी माणसाला हद्दपार केलं. आता सत्ता मिळवण्यासाठी पुन्हा मराठीवर बेगडी प्रेम करत आहात असं म्हणत टीकास्त्र सोडलं आहे. मराठीप्रेम म्हणजे निवडणुका जवळ आल्या की आठवण येणारी राजकीय नौटंकी असंही म्हटलं आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

मराठीच्या गोंडस नावाखाली आज उद्धव ठाकरे यांनी वरळीत सत्ता गेल्याचं शोकगीत गायलं. पण मुख्यमंत्री असताना २०२२ मध्ये पहिलीपासून हिंदी सक्तीचा अहवाल का स्वीकारला, याचं

▶▶ पान २ वर

## राज ठाकरेंचे आभार, बाळासाहेबांचे आशिर्वाद मलाच मिळाले असते-मुख्यमंत्री फडणवीस



हिंदी भाषेच्या सक्तीचा शासन आदेश रद्द करायला लावल्यानंतर आज मुंबईमध्ये ठाकरे बंधूंचा विजयी मेळावा झाला. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे महाराष्ट्रातील दोन बडे नेते आणि चुलत भाऊ तब्बल २० वर्षांनंतर एकत्र आले. वरळीच्या विजयी मेळाव्यात मराठी मुद्द्यावरून राज आणि उद्धव यांनी एकत्रित आपले विचार मांडले. भाषणाच्या सुरुवातीलाच राज ठाकरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खास ठाकरी शैलीमध्ये जोरदार टोला लगावला. जे बाळासाहेबांना जमलं नाही, इतरांना जमलं नाही, ते देवेंद्र फडणवीस यांनी करून दाखवलं, असे राज ठाकरे म्हणाले. त्यावर देवेंद्र फडणवीसांनी उत्तर दिले.

मी राज ठाकरे यांचे आभार मानतो की दोन बंधू एकत्र येण्याचे श्रेय त्यांनी मला दिले. सध्या बाळासाहेबांचे आशीर्वाद मलाच मिळत असतील. मला असं सांगण्यात आलं होतं की विजय मेळावा होणार आहे, पण त्या ठिकाणी रूदालीचे भाषण झाले. मराठी बद्दल एकही शब्द न बोलता आमचे सरकार गेले, आमचे सरकार पाडले, आम्हाला सरकारमध्ये घ्या, आम्हाला निवडून द्या, अशी ओरड दिसली. हा मराठीचा विजयोत्सव नव्हता, ही रूदाली होती. त्या रूदालीचे दर्शन कार्यक्रमात झाले, असे देवेंद्र फडणवीस हसत हसत म्हणाले.

त्यांच्या काळामध्ये मराठी माणूस मुंबईतून हद्दपार झाला. मोदींच्या नेतृत्वात आम्ही मुंबईचा चेहरामोहरा बदलवला. ठाकरेंच्या काळात मुंबईतून मराठी माणूस हद्दपार झाला. आम्ही बीडीडी चाळ, पत्राचाळ, अभ्युदय नगर येथील मराठी माणसाला हक्काचं मोठं घर त्याच ठिकाणी दिले. मी नेहमी सांगतो की 'पब्लिक है सब जानती है'. मुंबईतला मराठी असो की अमराठी, सगळेच आमच्या सोबत आहेत. आम्ही मराठी आहोत, आम्हाला मराठी असण्याचा अभिमान आहे. मराठी भाषेचा अभिमान आहे, पण त्याचवेळी आम्ही हिंदूही आहोत. आम्हाला हिंदुत्वाचा अभिमान आहे. आमचे हिंदुत्व सर्वांना सोबत घेऊन चालणारे हिंदुत्व आहे, असेही फडणवीसांनी ठणकावून सांगितले.

### डॉ. ज्योतीताईंनी घेतली रूपाली चाकणकर यांची भेट

## महिलांच्या लैंगिक छळ संरक्षण प्रतिबंध अधिनियमानुसार आरोपींवर कारवाई करावी - डॉ.ज्योती मेटे

बीड (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेल्या राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांची शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांनी येथील शासकीय विश्रामगृह येथे भेट घेतली. यावेळी बीड येथे उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेल्या घृणास्पद प्रकरा संदर्भात पोलीस यंत्रणेकडून निपक्ष चौकशी होऊन पुढील योग्य ती कारवाई होईल याकडे जातीने लक्ष द्यावे अशी विनंती केली आहे .

▶▶ पान २ वर



### विजय पवारची सैतानी विकृती ठेचून काढणार

## दुसऱ्या पिडित विद्यार्थीनीची आजच्या आज तक्रार घ्या-रूपाली चाकणकर



बीड (दिव्य न्युज):- उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेला प्रकार संतापजनक आणि गुरू-शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारा आहे. अशा सैतानी विकृती ठेचून काढण्यासाठी अधिकाधिक तिव्र गतीने या सर्व प्रकरणाचा तपास सुरू असल्याचे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपालीताई चाकरणकर यांनी सांगितले. विजय पवार, प्रशांत खाटोकर या दोघांसह त्यांना फरार होण्यास मदत करणाऱ्या अजय बोथरे याला देखील आरोपी करण्यात आलेले आहे. खाटोकर सदरील पिडितेला वारंवार गाडीवर घेऊन जाण्याचा प्रयत्न करत होता. त्यामुळे आता तो पिडितेला कुठे घेऊन जाणार होता ? याचा देखील शोध घेतला जाणार असल्याचे

▶▶ पान २ वर

## आषाढी एकादशी निमित्त जिल्ह्यात खाटीक समाजाचा मांस विक्री बंदचा निर्णय -जावेद कुरैशी

बीड , (दिव्य न्युज):-आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त बीड जिल्ह्यातील खाटीक समाजाने सर्व मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र राज्य खाटीक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तसेच एकता युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष जावेद भैय्या कुरैशी यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, हा निर्णय समाजाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी घेण्यात आला आहे.

आषाढी एकादशी हा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचा अत्यंत महत्त्वाचा सण आहे. या दिवशी लाखो भाविक पंढरपूरच्या विठ्ठल-रखुमाई दर्शनासाठी एकत्र येतात. या पवित्र दिवशी खाटीक समाजाने मांस विक्री बंद ठेवून धार्मिक सौहार्द आणि सामाजिक एकतेचा संदेश


▶▶ पान २ वर



## अकरावीत ऑनलाईन प्रवेश मिळाल्यानंतरही 'रेग्युलर' च्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून हजारोंची लूट ?

नेकनूर, (दिव्य न्युज):- इयत्ता अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमुळे प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता येईल, असा शिक्षण विभागाचा दावा होता. मात्र प्रत्यक्षात अनेक महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांकडून 'रेग्युलर'चे कारण पुढे करून हजारो रुपये अतिरिक्त रक्कम वसूल केली जात असल्याचे समोर येत

▶▶ पान २ वर




## स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात कॅन्सर विभाग पुर्ववत सुरु करा

### आ. नमिता मुंदडा यांनी केली अधिवेशनात मागणी



अंबाजोगाई , (दिव्य न्युज):- अंबाजोगाई येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात कॅन्सर विभाग पुर्ववत सुरु करण्यात यावा अशी मागणी आ. नमिता मुंदडा यांनी विधीमंडळाच्या अधिवेशनात केली आहे.

राज्यातील विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सध्या राज्य विधीमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात राज्यातील प्रत्येक आमदार आपल्या मतदारसंघातील


▶▶ पान २ वर

## शाही मशीद वादग्रस्त वास्तू मानण्याची हिंदू पक्षाची याचिका हायकोर्टाने फेटाळली

दिल्ली, (वृत्तसेवा):- मथुरा येथील श्रीकृष्ण जन्मभूमी आणि शाही ईदगाह मशिदीवरील सुरू असलेल्या कायदेशीर लढाईत एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली असून, अलाहाबाद उच्च न्यायालयाने हिंदू पक्षाची शाही मशिदीला वादग्रस्त वास्तू म्हणून घोषित करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली आहे.

अर्ज अ-४४ या याचिकेत न्यायालयीन नोंदी आणि पुढील कार्यवाहीत शाही ईदगाह मशिदीला अधिकृतपणे वादग्रस्त वास्तू म्हणून घोषित करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, सध्या या प्रकरणाची सुनावणी करणारे न्यायमूर्ती राम मनोहर नारायण मिश्रा यांच्या एकसदस्यीय खंडपीठाने ही याचिका फेटाळली.हिंदू पक्षाचे प्रतिनिधित्व करणारे वकील महेंद्र प्रताप सिंह यांनी दाखल केलेली ही याचिका

▶▶ पान २ वर



दिव्य वार्ता



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा साळींबा उपसासिंचन योजनेस हिरवा कंदील

## डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या पाठपुराव्याला यश

वडवणी, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील काही भाग कायम दुष्काळी व आवर्षणप्रवण क्षेत्र आहे. त्यामुळे बारमाही कोरडवाहू असलेली शेती ओलिताखाली आणण्यासाठी साळींबा उपसासिंचन योजना ही सदर भागातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असून शेतकऱ्यांच्या पाण्याच्या गरजा भागविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. मात्र अनेक वर्षापासूनच्या या मागणीला देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या पाठपुराव्यामुळे गती मिळाली आहे. सदरील योजनेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दिला असून या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी बाबत जलसंपदा विभागाला सूचना दिल्या आहेत. सदरील योजनेमुळे हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे.

वडवणी तालुक्यातील काही भागात वारंवार दुष्काळ पडतो. अल्प पर्जन्यमान व जलस्रोतांची मर्यादा यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडलेला आहे. परिणामी, शेती उत्पादनात घट होऊन शेतकऱ्यांना आर्थिक हानी सहन करावी लागते. साळींबा उपसासिंचन योजना राबविल्यास पाण्याची उपलब्धता वाढून ओलिताखालील शेतीचे क्षेत्र वाढण्यास मदत होईल. तसेच शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास देखील हातभार लागेल ही बाब शेटे यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.





उपरोक्त योजनेचे अंदाजपत्रक तयार करून जायकवाडी टप्पा - २ अंतर्गत सुधारित प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे. वडवणी तालुक्यातील कोरडवाहू शेतीस पाणी मिळण्यासाठी साळींबा ता. वडवणी जि. बीड उपसासिंचन योजनेस तातडीने मान्यता देऊन तिच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा आग्रह व विनंती डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती, त्यास यश आले असून सदरील योजनेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दिला असून या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी बाबत जलसंपदा विभागाला सूचना दिल्या आहेत. सदरील योजनेसाठी माजलगाव धरणाचे बँक वाटर वापरात येणार असून यात सहा गावच्या शिवारातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे.

## आ.संग्राम जगतापांना जीवे मारण्याची धमकी, आरोपीला हैदराबादमधून अटक

# बीड कनेक्शन उलगडलं

अहमदनगर , (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप गेल्या काही महिन्यांपासून चांगलेच चर्चेत आहेत. अजित पवार सातत्याने सर्वधर्म समभाव आणि छत्रपती, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा घेऊन आपण पुढे जात असल्याचं सांगतात. मात्र, त्यांच्याच पक्षाचे आमदार असलेल्या संग्राम जगताप यांनी हिंदुत्त्ववादी भूमिका घेतल्याचं अनेकदा पाहायला मिळालं. विशेष म्हणजे जाहीरपणे भाषणं करत त्यांनी मुस्लिमांना लक्ष्य केल्याचंही दिसून आलं होतं. तर अजित पवारांनी बोलावलेल्या आमदारांच्या बैठकीतही त्यांनी दांडी मारल्याने संग्राम जगताप यांच्या मनात नेमकं काय? असा प्रश्न राजकीय वर्तुळातून समोर येत होता. त्यातच, दोन दिवसांपूर्वी संग्राम जगताप यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याने खळबळ उडाली होती. अखेर, धमकी देणाऱ्यास हैदराबाद येथून अटक करण्यात आली आहे, पण आरोपी मूळ बीडचा असल्याचीही माहिती आहे.

आमदार संग्राम जगताप यांचे खासगी स्वीय सहाय्यक सुहास शिरसाठ यांच्या मोबाईलवर टेक्स्ट मेसेजद्वारे संग्राम जगताप यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्यानंतर, स्वीय सहायकाच्या तक्रारीवरुन अहिल्यानगरमधील कोतवाली पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा देखील दाखल झाला. मोबाईलवर आलेल्या या





मेसेजमध्ये संग्राम को दो दिन के अंदर खत्म करुंगा असा थेट जीवे मारण्याचा इशारा देण्यात आला होता. हिंदुत्वासंदर्भातील भूमिका आणि वक्तव्यांमुळे आमदार जगताप चर्चेत असतानाचा हा मेसेज आल्याने पोलिसांनी देखील त्या दृष्टीने तपास सुरू केला होता. अखेर, अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने हैद्राबाद येथील निजामाबाद तालुक्यातील धगगी या गावातून अटक केली आहे.

आरोपी मूळ बीडचा, हैदराबादेतून अटक

हिंदुत्ववादी भूमिकेमुळे चर्चेत असलेल्या अहिल्यानगरचे आमदार संग्राम जगताप यांना जीवे मारण्याची थेट धमकी देण्यात आली होती. अखेर, आरोपीला अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने हैद्राबाद येथील निजामाबाद तालुक्यातील धगगी या गावातून अटक केली आहे. संग्राम को दो दिन के अंदर खत्म करूंगा असा धक्कादायक टेक्स्ट मेसेज आमदार जगताप यांचे स्वीय सहाय्यक सुहास शिरसाठ यांना मिळाल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. अनिस महमद हनीफ शेख, मूळचा चकलांबा, जिल्हा बीड येथील असून सध्या तो नारेगाव संभाजीनगर येथे वास्तव्यास आहे. धमकीच्या पार्श्वभूमीवर कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबादमध्ये सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतलं आहे.

पान ४ वरून

## बीड नगर परिषदेतील

बहुतांश नागरिकांचे हाडे ठिसूळ झाल्याने गुडघे दुखतात. शिवाय हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह असलेल्या नागरिकांना तर इमारतीच्या पायऱ्यांवर चालत ये-जा करण्याऐवजी बसून पायऱ्या चढ-उतार करावी लागत असल्याचे दिसत आहे. एकंदरीत वसुली विभाग तिसऱ्या मजल्यावर असल्याने ज्येष्ठ नागरिकांना कर भरण्यासाठी गेल्यानंतर दमादम व्हावे लागत आहे. त्यांना मोठ्या प्रमाणात धापा लागत आहेत. एखाद्या वेळेस श्वासोच्छ्वास कमी अधिक प्रमाणात झाल्यास येथे एखाद्या वृद्धाचा जीव जाण्याचा धोकाही संभवतो. म्हणून बीड नगर परिषदेतील तिसऱ्या मजल्यावरील वसुली विभाग पहिल्या मजल्यावर नगरसेवकांसाठी असलेल्या हॉल मध्ये हलविण्यात यावे.

नगरसेवकांसाठी ठेवण्यात आलेल्या ऐसपैस हॉलचा वापर वर्षातून कधीतरी होतो आणि तिथे मोजकेच नगरसेवक कधीतरी येतात मात्र वसुली विभागात बीड शहरातील हजारो नागरिक दररोज ये-जा करतात. हे लक्षात घेऊन तिसऱ्या मजल्यावरून वसुली विभागाला खाली नगरसेवकांसाठी ठेवण्यात आलेल्या मोठ्या प्रशस्त हॉलमध्ये हलविण्यात यावे. अशी मागणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

## क्रांतिकारी शिक्षक

टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याचे ठरले होते. मात्र, ५ जून २०१५ पासून सुरू असलेल्या आंदोलनाकडे सरकार सातत्याने दुर्लक्ष करत असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष आहे. क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे संस्थापक सचिव कादरी शाहीद सर यांनी प्रसारमाध्यमांद्वारे जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे - शिक्षकांना एकीकडे 'देशाचे शिल्पकार' म्हणत त्यांच्या नावाने शिक्षक दिन साजरा करायचा, पुरस्कारांनी गौरवायचे, आणि दुसरीकडे त्यांनाच उपेक्षित ठेवायचे - हा विरोधाभास सहन केला जाणार नाही. शिक्षकांवरील अन्याय आम्ही खपवून घेणार नाही. ते पुढे म्हणाले, २०१४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी न झाल्यामुळे हजारो शिक्षकांचे जीवन अंधारात गेले आहे. शिक्षक रस्त्यावर उतरले असताना सरकारचे मौन अक्षम्य आहे. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक उग्र आणि राज्यभर पसरवले जाईल. या आंदोलनात राज्यातील शिक्षक आझाद मैदानावर उपस्थित राहून आपल्या हक्कांसाठी संघर्ष करत आहेत. क्रांतिकारी शिक्षक संघटना त्यांच्याबरोबर खंबीरपणे उभी असून, हे आंदोलन यशस्वी होईपर्यंत पाठिंबा देत राहील, असे संघटनेचे इतर पदाधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.

पान १ वरून

## राज अन् उध्दव एकत्र

उत्तर त्यांनी दिलंच नाही. 'मराठी भाषा' ही केवळ भावनांमध्ये उभी राहणारी अस्मिता नाहीतर ती धोरणात दिसली पाहिजे. पण मराठीच्या गोंडस नावाखाली आज उद्धव ठाकरे यांनी वरळीत सत्ता गेल्याचं शोकगीत गायलं. पण मुख्यमंत्री असताना २०२२ मध्ये पहिलीपासून हिंदी सक्तीचा अहवाल का स्वीकारला, याचं उत्तर त्यांनी दिलंच नाही. 'मराठी भाषा' ही केवळ भावनांमध्ये उभी राहणारी अस्मिता नाहीतर ती धोरणात दिसली पाहिजे. पण तुम्ही मुंबईत सत्तेत असताना मराठी माणसाला हद्दपार केलं. आणि आता सत्ता मिळवण्यासाठी पुन्हा मराठीवर बेगडी प्रेम करत आहात.

...तर आहोत आम्ही गुंड; उद्धव ठाकरेंचं मुख्यमंत्री फडणवीसांना आव्हान

आमच्या दोघांमधला अंतरपाट अनाजी पंतांनी दूर केला; उद्धव ठाकरेंचा फडणवीसांना टोला उद्धव ठाकरेंच्या भाषणातून स्पष्ट होतंय की, त्यांचा खरा अजेंडा 'म' म्हणजे 'मराठी' नाही, तर 'म' म्हणजे 'महापालिका' आहे! यांचं मराठीप्रेम म्हणजे निवडणुका जवळ आल्या की आठवण येणारी राजकीय नौटंकी आहे. जनतेनं आता हा दुटप्पीपणा ओळखला आहे असं चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटलं आहे.

निवडणुकीत हरणार म्हणून कुटुंब तहात जिंकण्याचा प्रयत्न; भाजपाचा पलटवार

भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरून याबाबत ट्वीट केलं आहे. भाषेसाठी नाही ही तर.. निवडणुकीसाठी जाहीर मनधरणी! महापालिका निवडणुका जवळ आल्यामुळे भाजपाला घाबरलेल्या उबाठा सेनेला आता भाऊबंदकी आठवली... ज्या भावाला घराबाहेर काढले त्याची जाहीर मनधरणी करण्यासाठी आजचा वरळीचा कौटुंबिक स्नेह मिलनाचा कार्यक्रम होता.भाषेचे प्रेम वगैरे काही नव्हतेच... निवडणुकीत हरणार म्हणून कुटुंब तहात जिंकण्याचा प्रयत्न! असं म्हणत निशाणा साधला आहे.

त्रिभाषा धोरणावरून राज्यात बराच गदारोळ झाला होता. पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या निर्णयाला विरोध झाला होता. त्रिभाषा सूत्रीत हिंदी भाषाच्या सक्तीचा निर्णय सरकारने मागे घेतल्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येऊन विजयी मेळावा घेतला. आज ५ जुलै २०२५ रोजी मुंबईतील वरळी परिसरातील डोम सभागृहात हा मेळावा पार पडणार आहे. यावेळी राज ठाकरेंनी सरकारवर जोरदार टीका केली.

'कोणताही झेंडा नाही. मराठी हाच अजेंडा. माझ्या मराठीकडे, महाराष्ट्राकडे वेड्यावाकड्या नजरेने पाहायचं नाही कुणी. खरंतर हा प्रश्नच अनाठायी होता. गरज नव्हती. कुठून हिंदीचं आलं ते कळलं नाही. हिंदी. कशासाठी हिंदी? कुणासाठी हिंदी. लहान लहान मुलांवर जबरदस्ती करताय तुम्ही. कुणाला विचारायचं नाही. शिक्षण तज्ज्ञांना विचारायचं नाही', असे राज ठाकरे म्हणाले.

पुढे ते म्हणाले, 'आमच्याकडे सत्ता आहे. आम्ही लादणार. तुमच्याकडे सत्ता असेल ती विधान भवनात. आमच्याकडे सत्ता आहे ती रस्त्यावर. एक पत्र लिहिलं. दोन पत्र लिहिली. नंतर दादा भुसे आले. भुसेंना म्हटलं ऐकून घेईल. पण ऐकणार नाही. त्रिभाषा सूत्र कुठून आले. ते आलं ते केंद्र सरकार. राज्य आणि केंद्र सरकारच्या दुव्यासाठी हे त्रिभाषा सूत्र आलं. कोर्टात इंग्रजीतच काम होतं. कुठे आहे त्रिभाषा सूत्र. इतर राज्यातही नाही. महाराष्ट्रात प्रयोग करून पाहिला त्यांनी.'

दक्षिणेतील राज्य हिंग लावून विचारत नाही यांना. पण महाराष्ट्र पेटून उठतो तेव्हा काय घडतं आणि काय होतं हे राज्यकर्त्यांना समजलं असेल. त्याशिवाय का माघार घेतली. विनाकारण आणलेला विषय़ होता. भूसेंना सांगतिलं. यूपी, मध्यप्रदेश, राजस्थानात कोणती तिसरी भाषा आणणार आहात. खरंतर आणली पाहिजे. गंमत पाहा. हिंदी भाषिक राज्य आर्थिक दृष्ट्या मागास. हिंदी न बोलणारी राज्य आथ्रिक दृष्ट्या प्रगत आहेत आणि वर हिंदी शिकायची आम्ही. हिंदी बोलणाऱ्यांना राज्य सांभाळता आलं नाही. रोजगाराला इकडे येतात. आम्ही आम्ही हिंदी शिकायचं. पाचवी नंतर मुलं काय हिंदी चित्रपट सृष्टीत जाणार का? आमचा भाषेला विरोध नाही. एक भाषा, एक लिपी उभी करायला वर्ष लागेल असे राज ठाकरे म्हणाले.

## महिलांच्या लैंगिक छळ

मा. सर्वोच्च न्यालायाने कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम व नियम २०१३ अनुसार शासन निर्णय दिनांक १९ जून २०१४ अन्वये महिला तक्रारनिवारण समिती गठीत करणे अनिवार्य आहे. सदर शासन निर्णयाचे अनुच्छेद ५ नुसार शैक्षणिक संस्थामध्येदेखील लैंगिक छळाच्या प्राप्त तक्रारीच्याअनुषंगाने तक्रार समिती गठीत करण्याची तरतूद आहे. उमाकिरण शैक्षणिक संकुलामध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त कर्मचारी यांचा समावेश असल्यास येथे अशी समिती गठीत करण्यात आली होती किंवा कसे, नसल्यास संबधित नियोक्ता यांचेविरुद्ध या अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी अथवा अशी समिती नियुक्त असल्यास समितीने पार पाडलेली जबाबदारी याचा आढावा घेण्यात यावा. पिडीतेचा माध्यमातून समोर आलेला जबाब पाहता अशी समिती कार्यरत असती तर या घटनेस निश्चितच प्रतिबंध झाला असता असे सखेद नमूद करण्यात येते. मागील काही वर्षात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी खाजगी कोचिंग क्लासेस कार्यरत आहेत, सबब राज्य महिला आयोगाकडून यासर्व ठिकाणी सदर अधिनियमातील तरतुदीनुसार समितीचे गठन होणे व समितीने पार पाडलेली जबाबदारी याचा नियमित आढावा घेण्यात यावा जेणेकरून भविष्यात अशा घटनास प्रतिबंध होईल. याबाबी निदर्शनास आणून दिल्या याप्रसंगी साक्षी हंगे, गीतांजली डोरले, संगीता ठोसर, साधना दातखिळ, संध्या लांगोरे, प्रणिता लांगोरे , मनोज जाधव, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले, अतुल लांगोरे आदी सह शिवसंग्रामच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

## दुसऱ्या पिडित विद्यार्थीनीची

त्यांनी सांगितले. त्याचबरोबर या प्रकरणामध्ये इतरही काही पालक आणि पिडित विद्यार्थीनी समोर येत आहेत. तीन दिवसांपुर्वीच एका पालकाने स्वत:च्या मुलीवर विजय पवारने असेच कृत्य केल्याचे सांगितले असून त्या पिडित विद्यार्थीनीची तक्रार आजच्या आज घ्या, पिडितेसह तिच्या पालकाचा जबाब नोंदवण्याची कार्यवाही करा अशा सुचना पोलीस प्रशासनाला दिल्याचे रूपाली चाकणकर यांनी सांगितले. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनी आज सकाळी पोलीस अधिक्षक कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. यावेळी पोलीस अधिक्षक नवनीत काँवत उपस्थित होते. रूपाली चाकणकर म्हणाल्या की, बीडमधील घटना गुरू-शिष्याच्या नात्याला काळीमा फासणारी आहे. या प्रकरणातील आरोपी विजय पवार, प्रशांत खाटोकर यांचे मोबाईल, लॅपटॉप जप्त करण्यात आले आहेत. सीसीटीव्ही फुटेजचा डाटा देखील जप्त करण्यात येत आहे. पोलीसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केलेला असून त्यामध्ये आता एसआयटी देखील नियुक्त करण्यता आलेली आहे. त्यामुळे सर्व बाजूंनी तपास होईल असे त्यांनी सांगितले. खाटोकर पिडितेला वारंवार गाडीवर घेऊन जाण्याच्या प्रयत्नात होता, त्याची नेमकी मानसिकता काय होती ? तो कुठे घेऊन जाणार होता ? याचा देखील शोध चौकशीअंती घेण्यात येणार आहे. आरोपींनी त्यांच्या मोबाईलमध्ये काही रेकॉर्डिंग केले आहे का ? हे देखील तपासले जात असून त्यानुसार आरोपामध्ये पुरवणी आरोपपत्र जोडले जाईल असेही त्यांनी सांगितले. पिडिता डिप्रेशनमध्ये आहे, त्यातून बाहेर पडण्यासाठी तिला काही वेळ दिला गेल्यास आणखी काही माहिती समोर येऊ शकते. या आरोपींना कठोरात कठोर शिक्षा कशी होईल ? या दृष्टीने पोलीस प्रशासनाचा, एसआयटीचा तपास सुरू असल्याचे त्या म्हणाल्या.

## आषाढी एकादशी निमित्त

देण्याचा प्रयत्न केला आहे. जावेद भैय्या कुरैशी यांनी सांगितले की, आम्ही सर्व धर्मांचा आदर करतो आणि आषाढी एकादशीच्या निमित्ताने आमच्या समाजाने हा निर्णय घेऊन सामाजिक समरसतेचे दर्शन घडवले आहे.बीड जिल्ह्यातील सर्व खाटीक समाज बांधवांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, यामुळे समाजात सकारात्मक संदेश पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. याशिवाय, खाटीक समाजाने यापूर्वीही अनेक सामाजिक उपक्रम राबवले असून, एकता आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील धार्मिक आणि सामाजिक वातावरण अधिक सौहार्दपूर्ण होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा जावेद भैय्या कुरैशी यांनी व्यक्त केली आहे.

## अकरावीत ऑनलाईन

आहे. विशेष करून ग्रामीण भागातील महाविद्यालयाकडून हे प्रकार होत असल्याचे बाब समोर येत आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे यशस्वीरित्या प्रवेश मिळवलेला असूनही, संबंधित महाविद्यालयांकडून हे केवळ ऑनलाइन आहे, प्रत्यक्ष प्रवेशासाठी रेग्युलर या असा दबाव टाकला जातोय. अन्यथा २० ते २५ हजार रुपयांपर्यंत शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. हा प्रकार केवळ आर्थिक शोषणाचा आहे, असा आरोप पालक व विद्यार्थ्यांकडून केला जात असून, ही मनमानी थांबवण्याची मागणी सध्या जोर धरू लागली आहे. शासनाने निर्धारित केलेल्या प्रक्रियेला हरताळ फासणाऱ्या या प्रकाराकडे शिक्षण विभाग गांभीर्याने लक्ष देणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. चालू अधिवेशनात शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन संबंधित संस्थांवर कारवाई करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांत व पालकांमधून होत आहे.

## स्वाराती वैद्यकीय

प्रलंबित प्रश्न अधिवेशनात विधिमंडळ सभापतींच्या समोर मांडुन ते मार्गी लावण्याचा प्रयत्न करीत असतात.अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय हे आशिया खंडातील एकमेव ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आहे. या वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या माध्यमातून मराठवाड्यातील ग्रामीण भागातील रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा राज्य शासन सातत्याने प्रयत्न करीत असते. याच उद्देशाने या वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात या विभागातील कॅन्सर रोगाने ग्रस्त झालेले अनेक रुग्ण आढळून येत असल्यामुळे सुमारे पंचेवीस वर्षांपूर्वी या वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागात कोट्यवधी रुपये खर्चून स्वतंत्र कॅन्सर विभाग निर्माण करण्यात येवून या विभागात रोग निदान आणि उपचारांची सुरुवात करण्यात आली होती. मात्र हा विभाग कालांतराने पुरेसे तंत्रज्ञ आणि अनुभवी तज्ञ डॉक्टर मिळत नसल्याने बंद करण्यात आला.

सदरील विभाग बंद होवून ही आता पंचेवीस वर्षांचा कालावधी उलटून गेला असतांनाच या विभागाच्या आ. नमिता मुंदडा यांनी विधीमंडळाच्या अधिवेशनात मा. सभापती महोदयांसमोर बोलताना या विभागात अजून ही मोठ्या प्रमाणावर कॅन्सर चे रुग्ण आढळून येत असून या रुग्णांना आर्थिक परिस्थिती नसतांनाही संभाजी नगर अथवा मुंबई येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी जावे लागते असे सांगत या रुग्णांची हेळसांड थांबवण्यासाठी अंबाजोगाई येथील स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागात पुन्हा नव्याने कॅन्सर विभाग सुरु करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनात आमदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या वेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री व संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित असल्यामुळे या प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्यात येते. या आ. नमिता मुंदडा यांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नांवर संबंधित मंत्री काय निर्णय घेतात याकडे मतदार संघातील नागरीकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## शाही मशीद वादग्रस्त

श्रीकृष्ण जन्मभूमी मंदिर संकुलाजवळील जमिनीवर शाही ईदगाह मशिदीने केल्याच्या कथित अतिक्रमणाशी संबंधित मोठ्या खटल्याचा एक भाग होती.

अर्ज अ-४४ मध्ये न्यायालयाला विशेष विनंती करण्यात आली होती की, त्यांनी संबंधित स्टेनोग्राफरला चालू असलेल्या प्रकरणाच्या कागदपत्रांमध्ये आणि भविष्यातील कार्यवाहीत शाही ईदगाह मशीद हा शब्द बदलून वादग्रस्त वास्तू असा करण्याचे निर्देश द्यावेत. पण मुस्लिम पक्षाने या मागणीवर लेखी आक्षेप सादर केला आणि मशिदीच्या अधिकृत संदर्भांमध्ये अशा बदलाला विरोध केला.दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर, उच्च न्यायालयाने याचिका फेटाळून लावली आणि मुस्लिम पक्षाने उपस्थित केलेला आक्षेप कायम ठेवला.मथुरा येथील श्रीकृष्ण जन्मभूमी आणि शाही ईदगाह मशिदीभोवती असलेल्या वादग्रस्त जमिनी आणि धार्मिक दाव्यांशी संबंधित हिंदू पक्षाच्या विविध सदस्यांनी दाखल केलेल्या १८ याचिकांपैकी हा खटला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २ ऑगस्ट रोजी होणार आहे.हा वाद औरंगजेबाच्या काळातील मथुरा येथील शाही ईदगाह मशिदीशी संबंधित आहे. भगवान कृष्णाच्या जन्मस्थळी असलेले मंदिर पाडून मशीद बांधण्यात आल्याचे म्हटले जाते. १९६८ मध्ये, मंदिराचे व्यवस्थापन करणारे अधिकारी श्रीकृष्ण जन्मस्थान सेवा संस्था आणि शाही मशीद ईदगाह ट्रस्ट यांच्यात एक करार झाला. या करारानुसार दोन्ही प्रार्थनास्थळे एकत्र चालविण्यास परवानगी देण्यात आली. परंतु नंतर या कराराच्या वैधतेला न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.